वयोगट 3 ते 9

जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार

# उन्हाळी सुट्टी

# वेध उपक्रम



वेध परिवार



**श्री. नंदकुमार (IAS)**
**वेध प्रेरणास्रोत**

**नमस्कार,**

**विद्यार्थी मित्रांनो!**

मुलांनो उन्हाळी सुट्टीची आपण आतुरतेने वाट पाहत होतात, त्या उन्हाळी सुट्ट्या आता सुरु आहेत. उन्हाळी सुट्टी खेळणे-बागडणे याची जेवढी संधी देते तेवढीच संधी नवीन बाबी शिकण्यासाठी पान मिळते. आपल्याला मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून, शैक्षणिक वर्षात छंद जोपण्यासाठी वेळ मिळाला नाही ती कमतरता भरून काढू. आवडीचे काम करत या वेळी नवनवीन गोष्टी शिकूया.

सुट्टीमध्ये आपले छंद जोपासण्यासोबतच आपल्यातील नवनिर्मितीला वाव मिळावा. सृजन आणि तार्किक क्षमता वाढावी यासाठी वेध परिवाराकडून उन्हाळी सुट्टीतील उपक्रम तयार करण्यात आले आहेत. तुम्हाला आवडतील असे विविध उपक्रम, कृती, प्रात्यक्षिके, छोटी-छोटी गृहकार्ये देण्यात आलेली आहेत. सदर उपक्रमातून तुम्हाला आनंद तर मिळेलच, सोबत शिकणे सुद्धा होईल. उन्हाळी उपक्रम करतांना आवश्यक तेथे घरातील नातेवाईकांची मदत घेत येईल. यानिमित्ताने त्यांचा सहवास आणि स्नेह लाभेल. उन्हाळी सुट्टी उपक्रम पुस्तिका विकसित करणाऱ्या सर्व वेध स्त्रोत आणि समन्वय साठी श्रीमती. वनिता कोले यांचे अभिनंदन.

सुट्टीमधील या गंमतीशीर आणि आनंददायी अभ्यासासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!

**श्री. नंदकुमार (IAS)**
**वेध प्रेरणास्रोत**



**श्री. निलेश घुगे,**
**वेध संयोजक**

**सर्वांना नमस्कार,**

सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा आहे. दिवसेंदिवस जग झपाट्याने बदलत आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटी इ. बाबींच्या मदतीने आपला मानव झपाट्याने प्रगती करत आहे. या बदलत्या जगामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर आपल्या नियमित पाठ्यक्रमाबरोबरच इतर उपयुक्त कौशल्य सुद्धा आत्मसात करावे लागणार आहेत. म्हणून आपण आपल्यातील निर्मितीचे कौशल्य वृद्धिंगत करून क्रिटिकल थिंकिंग वाढीस लागावी यासाठी दररोज नवीन काहीतरी शिकावे लागणार आहे.

उन्हाळयाच्या सुट्टीत आहे तिथे, हसत-खेळत स्वत: शिकण्याची संधी वेध परिवार निर्माण करत आहे. वेध परिवाराने दिलेला अभ्यास स्वतः आणि आवश्यकता असेल तेव्हा घरातील इतर मंडळीच्या सहकार्याने करता येणार आहे. या मजेदार उपक्रम/कृती करताना आपल्याला छान अनुभव येतील. कृतीतून चिंतनाद्वारे शिकणे म्हणजे आपसूकच उपयोजनाला वाव मिळेल आणि तेव्हा आपण स्वतःच ज्ञानाची रचना करू शकू. कृतीतून मिळालेले हे ज्ञान नक्कीच कायमस्वरूपी उपयुक्त ठरणारे असणार आहे. म्हणून आपण या कृतींचा मनसोक्त आनंद लुटुया.

आपल्या सर्वांना पुढील एक महिनाभर हसत खेळत शिकण्यासाठी खूप खूप हार्दिक शुभेच्छा!

**श्री. निलेश घुगे,**
**वेध संयोजक**

# प्रस्तावना

**"मुलांसोबत सुलभकांनी/शिक्षकांनी आचाराने नव्हे तर विचाराने राहायला हवे..."** असं **'वेध'** नेहमीचं म्हणत आलेला आहे. कोरोना कालावधीत जेव्हा सगळीच नित्यकार्ये थांबली होती. त्यावेळी झूम या ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून वेध PLC ने काम सुरू केलं. वेधसोबत जुळलेल्या शिक्षकांनी मग याच पद्धतीने मुलांसोबत काम केलं आणि त्याचे चांगले परिणामही मिळाले. शिक्षक ऑनलाईन च्या माध्यमातून मुलांसोबत सतत आहेत. त्यामुळे शाळा सुटलेली असो, रविवारची सुट्टी असो किंवा मग दिवाळी अन उन्हाळी सुट्टी असो मुलांचं शिकणं थांबलेलं नाहीये आणि थांबणारही नाही.

नुकतीच 2 मे पासून संपूर्ण राज्यात उन्हाळी सुट्टी सुरू झाली. सगळीकडे **'मामाचं गाव'** अन **'समर कॅम्प'** ची लगबग सुरू झाली. मुलांची पालकांना एकच विनंती की, **"अभ्यास सोडून दुसरं काहीही सांगा आम्ही करायला तयार आहोत."** हाच धागा पकडून मग वेध ग्रुपने राज्यातील मुलांसोबत विविध उपक्रमांच्या माध्यमातून कसं काम करता येईल यावर विचारमंथन करून डॉक्युमेंट बनविले. ज्यातून मुलांचं शिकणं तर सुरू राहील पण त्यांना कंटाळाही येणार नाही.

प्रस्तुत डॉक्युमेंट मध्ये आपणांस एकूण वर्गानुसार चार भाग दिसून येतील. ज्यामध्ये प्रवेशित 1 ली ते 12 वी पर्यंतच्या मुलांना वयोगटानुसार उपक्रमांची आखणी केलेली आहे. मुलांसाठी **घरातील अगदी छोट्या कामापासून ते आर्थिक आणि राजकीय** गोष्टींपर्यंत उपक्रमांच्या आधारे आपण मुलांना **'सहज शिक्षण'** देणार आहोत. या उपक्रमांमध्ये मुलांसोबतच त्यांचे शिक्षक, मित्र, पालक, नातेवाईक यांचाही सहभाग असणार आहे. मुलांना अधिकचे काही देता यावे यासाठी आपण विविध क्षेत्रात काम करणारे मान्यवर, यशस्वी मुले यांचेही झूम किंवा युट्युबच्या माध्यमातून **'हितगुज'** सत्र ठेवणार आहोत. आपले काही **'वेधस्रोतही'** ऑनलाईन च्या माध्यमातून आपल्या भेटीला येतील.

चला तर मग मुलांनो **"खेळता-खेळता शिकूया आणि शिकता-शिकता खेळूया..."**

**वेध परिवार, महाराष्ट्र**

## सर्वसाधारण सूचना विद्यार्थी व सुलभक यांच्यासाठी

1) सुलभक याचा अर्थ मुलांचे शिक्षक, पालक, मित्र, शेजारी, नातेवाईक जे कुणी उपक्रम करताना मुलांसोबत असणार आहेत.

2) उपक्रमांची रचना वर्ग लक्षात घेऊन करण्यात आलेली आहे.

3) उपक्रमांचा क्रम जसा आहे तसेच उपक्रम घ्यायला हवेत असे बंधन नाही.

4) दिलेला उपक्रम वैयक्तिक करायचा की पिअरने(शिकण्यास पूरक अशी जोडी) करायचा किंवा ग्रुपने करायचा याचा निर्णय मुलाने घ्यावा पण सुलभकही त्याला नक्कीच निर्णय घेण्यात मदत करू शकतो.

5) उपक्रम घेत असताना तो उपक्रम व त्याखाली दिलेले सर्व मुद्दे यांचे काळजीपूर्वक वाचन करूयात मगच उपक्रम घेऊयात.

6) सुलभकांसाठी उपक्रमात काही विशेष सूचना असतील तर त्याचे काटेकोरपणे पालन करूयात.

7) आपल्या मुलाचा उपक्रमात किती कृतिशील सहभाग आहे त्यानुसार खालच्या किंवा वरच्या वर्गाचे उपक्रम घेण्याचे आपणास पूर्ण स्वातंत्र्य आहे.

8) एखादा उपक्रम समजला नसेल तर त्या गटाची श्रेयनामावली व नंबर दिलेले आहेत आपण संपर्क करू शकता.

9) उपक्रम घेतलेले काही नाविन्यपूर्ण फोटो, आठवणी ग्रुपवर शेअर करूयात. त्यामुळे इतरांना प्रेरणा मिळेल.

10) सर्व उपक्रमांचा आनंद मुलांसोबत आपणही घेऊयात.

**आपणांस व आपल्या परिवारास उन्हाळी सुट्टीच्या वेध परिवाराकडून खूप-खूप शुभेच्छा !**

- **उपक्रम** : **विविध आकृतीबंध तयार करणे.**
- **उद्देश** :
  - ❖ आकृतीबंध हा संबोध पक्का होणे.
  - ❖ स्वतःची उदाहरणे तयार करता येणे.
  - ❖ क्रिएटिव्ह थिंकिंग करता येणे.
  - ❖ क्रिटिकल थिंकिंगची सवय होणे.
- **साहित्य** : घरातील विविध वस्तू...

  जसे- चमचे, वाट्या, ग्लास, डिश,

  इयरबड्स, कॅरमच्या सोंगट्या इ.
- **Youtube Link** : https://youtu.be/Lh5y_G3Xjs?si=USDAcNiyAn9wUv5l
- **सूचना** : पालकांच्या मदतीने विविध साहित्य गोळा करणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन
- **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता

➢ **उपक्रम** : **घरातील मोठ्या व्यक्तींकडून घरगुती, सोपे प्रथमोपचार माहीत करून घेणे.**

➢ **उद्देश** :
- ❖ घरगुती काही सोपे उपचार माहिती होणे.
- ❖ प्रथमोपचार ही संकल्पना माहिती होणे.
- ❖ प्रथमोपचाराचे महत्त्व समजणे.

➢ **साहित्य** : आजीचा बटवा, प्रथमोपचार पेटी

➢ **Youtube Link** : -

➢ **सूचना** : आजी आजोबा किंवा आई-वडिलांशी याविषयावर संवाद साधा व माहिती गोळा करा.

➢ **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

➢ **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.

➢ **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : मातृभाषेतून संवाद साधत असताना, वाक्यात येणारे इंग्रजी शब्द लक्षात घेणे व या शब्दांसाठी मातृभाषेतील शब्द शोधणे.

- **उद्देश** :
  - श्रवण कौशल्य विकसित होणे.
  - शब्द संपत्ती वृद्धिंगत होणे.
  - मातृभाषेविषयी जिव्हाळा निर्माण होणे.

- **Youtube Link** : -

- **सूचना** :
  - कुटुंबातील सदस्यांशी संवाद करत असताना वाक्यात येणारे इंग्रजी शब्द लक्षात घ्या, वहीत लिहा.
  - इंग्रजी शब्दांसाठी मातृभाषेतील अचूक शब्द शोधा व वहीत लिहा.अशा शब्दांची यादी करा.

- **Learning intervention** : पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन

- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता,आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **कुटुंबातील, शेजारील किंवा परिसरातील प्राण्यांविषयी माहिती सांगणे.** |
| ➢ उद्देश | : | ❖ विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होता येणे.<br>❖ निरीक्षण क्षमता विकसित होणे.<br>❖ पक्षी व प्राण्यांविषयी जिव्हाळा निर्माण होणे. |
| ➢ साहित्य | : | |
| ➢ सूचना | : | १)परिसरातील प्राण्यांचे निरीक्षण करा.<br>२) घरातील तसेच परिसरातील प्राण्यांविषयी माहिती सांगा. |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन. |
| ➢ 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता, निसर्गविषयक बुद्धिमत्ता |

➢ **उपक्रम** : **माती किंवा मण्यांपासून दशकाच्या माळा व सुट्टे तयार करणे.**

➢ **उद्देश** :
- ❖ आनंददायी शिक्षण
- ❖ कृतीयुक्त शिक्षण
- ❖ सहज शिक्षण

➢ **साहित्य** : माती, पाणी,चाळण, मणी, सुई, दोरा.

➢ **Youtube Link** : https://youtu.be/2I6Y--uqMOk?si=DcokMs9WtQSsBX9_

➢ **सूचना** :
- माती चाळून घ्या.
- थोडे थोडे पाणी टाकून त्याचे मण्यांच्या आकारा एवढे गोळे तयार करा.
- एक एक गोळा घेऊन सुईने दोऱ्यात ओवा. दहा गोळ्यांची मिळून एक माळ तयार करा.
- काही गोळे सुट्टे ठेवा.
- माळा आवडत्या रंगाने रंगवा.
- अशाच रीतीने दशकांच्या माळा मण्यांच्या साह्याने करा.

➢ **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

➢ **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.

➢ **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता,आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **सूर्यनमस्कार व योगासने.** |
| ➢ उद्देश | : | ❖ आरोग्यदायी सवयी लावणे.<br>❖ व्यायामाचे महत्त्व समजणे. |
| ➢ साहित्य | : | चटई, पाणी बॉटल. |
| ➢ Youtube Link | : | https://youtu.be/_eCHrcq5wRY?feature=shared |
| ➢ सूचना | : | • Video बघून सूर्यनमस्कार, योगासने<br>• आणि ओमकार करावे. |
| ➢ Learning intervention | : | पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन. |
| ➢ 9 Intelligences | : | शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्ता. |

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **कोलाजकाम.** |
| ➢ उद्देश | : | ❖ सौंदर्य विषयक दृष्टी निर्माण करणे. |
| ➢ साहित्य | : | डाळ, कागद, काडी, पाणी, फुले, फेविकॉल आणि कागद. |
| ➢ Youtube Link | : | https://youtu.be/w_la4dtljY4?si=-3Ybr2ecc8ZHRVw2 |
| ➢ सूचना | : | • व्हिडिओ बघून कृती करा. |
| ➢ Learning intervention | : | पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग. |
| ➢ 9 Intelligences | : | आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता. |

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **चांगल्या सवयींची रुजवणूक.** |
| ➢ उद्देश | : | ❖ मुलांमध्ये चांगल्या सवयी रुजवणे. |
| ➢ साहित्य | : | अँड्रॉइड मोबाईल फोन, बोधपर गोष्टीची पुस्तके. |
| ➢ Youtube Link | : | https://youtu.be/RguCzJhvN9o?si=Px3DmcX8hEqJ_Fxs |
| ➢ सूचना | : | • व्हिडिओ बघून कृती करा. पुस्तके वाचा. |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक,पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | कम्पॅशन,कम्युनिकेशन, कोलॅबरेशन. |
| ➢ 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता,तार्किक बुद्धिमत्ता. |

- **उपक्रम** : **नृत्य.**
- **उद्देश** :
  - ❖ मुलांमध्ये नृत्यविषयक आवड निर्माण करणे.
  - ❖ मुलांचा शारीरिक विकास घडवणे.
- **साहित्य** : Audio, Video
- **Youtube Link** : https://youtu.be/RguCzJhvN9o?si=Px3DmcX8hEqJ_Fxs
- **सूचना** :
  - आपल्या आवडीच्या गाण्याचा व्हिडिओ लावून त्यानुसार नृत्य करा.
- **Learning intervention** : वैयक्तिक,पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग.
- **9 Intelligences** : शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **चला स्वावलंबी होऊया.**

- **उद्देश** :
  - ❖ मुलांमध्ये स्वावलंबीवृत्ती जोपासणे.
  - ❖ घरातील छोट्या छोट्या कामात मदत करण्यास प्रेरित करणे.
  - ❖ श्रमप्रतिष्ठा रुजवणे.

- **साहित्य** : अँड्रॉइड मोबाईल.

- **Youtube Link** : -

- **सूचना** :
  - कपड्यांच्या घड्या घालणे, स्वत:चा रुमाल धुणे. भाजी निवडणे, भांडी लावणे यांसारख्या कामात मदत करणे व त्याचा व्हिडिओ बनवणे.

- **Learning intervention** : पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : कम्पॅशन, कोलाबरेशन, कॉन्फिडन्स.

- **9 Intelligences** : शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **घरातील मोठ्या व्यक्तींकडून घरगुती सोपे प्रथमोपचार माहीत करून घेणे.** |
| ➢ उद्देश | : | ❖ घरगुती काही सोपे उपचार माहिती होणे.<br>❖ प्रथमोपचार ही संकल्पना माहिती होणे.<br>❖ प्रथमोपचाराचे महत्त्व समजणे. |
| ➢ साहित्य | : | आजीचा बटवा, प्रथमोपचार पेटी. |
| ➢ Youtube Link | : | - |
| ➢ सूचना | : | • आजी आजोबा किंवा आई-वडिलांशी याविषयावर संवाद साधा व माहिती गोळा करा. |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन. |
| ➢ 9 Intelligences | : | आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता. |

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **चित्र ओळखून नाव सांगणे.** |
| ➢ उद्देश | : | ❖ पाहिलेले चित्र ओळखून समजपूर्वक त्याचे नाव सांगता येणे. |
| ➢ साहित्य | : | विविध चित्रे असलेल्या युट्युब व्हिडिओज. |
| ➢ Youtube Link | : | https://youtube.com/watch?v=h60GFqhsZs4&feature=shared<br>https://youtu.be/b4zRZb9o-Zo?si=3nTfUEznLuBN8F3r |
| ➢ सूचना | : | • |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स. |
| ➢ 9 Intelligences | : | भाषिक व तार्किक बुद्धिमत्ता. |

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **सागरगोट्या, कवड्या,चंपूल यांसारखे खेळ खेळणे.** |
| ➢ उद्देश | : | ❖ विस्मरणात चाललेले देशी खेळ विद्यार्थ्यांनी माहिती करून घेणे.<br>❖ खेळाचा आनंद घेणे.<br>❖ निरीक्षण व तार्किक क्षमता विकसित होणे. |
| ➢ साहित्य | : | सागरगोटे, कवड्या, अंक असलेले ठोकळे आणि पाटी. |
| ➢ Youtube Link | : | https://youtu.be/i_uPwFH7piY?si=8oDosdVLNvgP02ka<br>https://youtu.be/ePhxvAoXvkE?si=wcNxAsS2GBElf8TI |
| ➢ सूचना | : | • |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स. |
| ➢ 9 Intelligences | : | तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता. |

- **उपक्रम** : **बिया गोळा करून त्यांचे फळझाडे व फुलझाडे यामध्ये वर्गीकरण करणे.**

- **उद्देश** :
  - बियांचा संग्रह करणे.
  - निरीक्षण व तार्किक क्षमता विकसित होणे. वर्गीकरण करणे.
  - निसर्गाविषयीची आवड व संवर्धनाविषयीची जाणीव जागृती करणे.

- **साहित्य** : परिसरात आढळणाऱ्या वनस्पतींच्या बिया, रिकाम्या डब्या किंवा छोट्या कागदी किंवा कापडी पिशव्या.

- **Youtube Link** :

- **सूचना** :
  - पालक, मित्र आणि इतरांची मदत घेऊन बियांचा संग्रह करणे.
  - बियांचे फळझाडे व फुलझाडे यामध्ये वर्गीकरण करणे.
  - वेगवेगळ्या फळझाडांच्या बिया व फुलझाडांच्या बिया नावानुसार वेगवेगळ्या पिशव्यांमध्ये किंवा डब्यांमध्ये भरणे व नावांचे लेबल लावणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग,क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स.

- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, निसर्गविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : किराणा मालाच्या दुकानातील वस्तू आणि किमती याची यादी करणे. दोन किंवा अधिक वस्तूंची बेरजेची उदाहरणे तयार करणे.

- **उद्देश** :
  - ❖ निरीक्षण व तार्किक क्षमता विकसित करणे.
  - ❖ मिळवलेल्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करणे.

- **साहित्य** : किराणा मालाच्या दुकानात पाहिलेल्या वस्तू किंवा दुकानातून आणलेल्या वस्तू,वही आणि पेन

- **Youtube Link** :

- **सूचना** :
  - पालकांसोबत किराणा मालाच्या दुकानास भेट देणे.
  - दुकानात जाणे शक्य नसल्यास घरात आणलेल्या किराणा सामानातून वस्तूंच्या नावाची व किंमतीची यादी करणे.
  - दोन किंवा तीन वस्तूंच्या किमतींच्या बेरजेची उदाहरणे तयार करून वहीत सोडवणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग,क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.

- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, भाषिक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : सकाळी किंवा रात्री आकाशाचे निरीक्षण करून काय दिसते ते सांगणे आणि नोंदी करणे.

- **उद्देश** :
  - ❖ आकाश निरीक्षणाचा आनंद घेणे.
  - ❖ पालकांच्या मदतीने ग्रहताऱ्यांविषयीची माहिती मिळवणे.
  - ❖ निरीक्षण क्षमता विकसित होणे.
  - ❖ खगोलशास्त्राची आवड निर्माण होणे.

- **साहित्य** : अँड्रॉइड मोबाईल, वही व पेन.

  App- Sky view lite

- **Youtube Link** : https://www.youtube.com/live/Tt3Gmb1XoSE?si=LVwRrvWGCasCy71f

- **सूचना** :
  - पालकांसोबत सकाळी किंवा रात्री आकाशाचे निरीक्षण करणे.
  - आकाशात दिसणाऱ्या ढगांच्या रंगछटा,आकार, ग्रह आणि तारे यांच्या आकाशात दिसण्याच्या वेळा आणि स्थान याविषयी निरीक्षण करून वहीत नोंदी करणे.
  - YouTube link आणि ॲपच्या सहाय्याने अधिकची माहिती जाणून घेणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग,क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.

- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, अवकाशीय बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **भेळ, सरबत, लस्सी, फ्रुट सॅलड यासारखे पदार्थ बनवून पहाणे व त्याचा तयार करतानाचा व्हिडिओ बनवणे.**

- **उद्देश** :
  - ❖ स्वयंपाक घरातील सोप्या कामांचा अनुभव घेणे.
  - ❖ आईला घरकामात मदत करणे.
  - ❖ स्वनिर्मितीचा आनंद घेणे.

- **साहित्य** : चुरमुरे, शेव, कांदा, कैरी, टोमॅटो, कोथिंबीर ,लिंबू ,पाणी, साखर, मीठ, सुरी, दही किंवा ताक, घरातील उपलब्ध फळे, चमचे ,ग्लास आणि डिश.

- **Youtube Link** :

- **सूचना** :
  - पालकांच्या निरीक्षणाखाली कांदा, टोमॅटो, कोथिंबीर आणि फळे कापणे.
  - भेळ, सरबत, लस्सी, फ्रुट सॅलड तयार करणे आणि घरातील व्यक्तींना देणे.
  - बनवलेल्या पदार्थांचा व्हिडिओ तयार करणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स.

- **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता, शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **चला तंत्रज्ञान शिकूया.** |
| ➢ उद्देश | : | ❖ व्हाट्सअप वर साधा मेसेज (टेक्स्ट मेसेज), व्हाट्सअप मेसेज च्या माध्यमातून आपल्या मित्रांना Good morning, Good afternoon, How are you…अशा प्रकारचे चॅटिंग करणे. |
| ➢ साहित्य | : | साधा मोबाईल किंवा अँड्रॉइड मोबाईल |
| ➢ Youtube Link | : | https://youtu.be/XJD1Udk7ohQ?si=USUa3Bpy5qufRUBp |
| ➢ सूचना | : | • |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन. |
| ➢ 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता. |

- **उपक्रम** : **चला पाढा शिकूया.**
- **उद्देश** :
  - ❖1ते 10 पाढे तयार करण्यास शिकणे.
  - ❖पाढ्यांचे महत्त्व समजणे.
  - ❖मुलांना पाढे तयार करून शिकण्यास प्रेरित करणे.
- **साहित्य** : कागद, पेन, पेन्सिल.
- **Youtube Link** : https://youtu.be/EY46eW26IJg?si=4Ebvb8GbFVZLnaUn
- **सूचना** :
  - व्हिडिओ बघून आपल्या मित्रांबरोबर किंवा भावंडांबरोबर पाढे तयार करणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग.
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **चला शिवणकाम करूया.** |
| ➢ उद्देश | : | ❖ मुलांना शिवणकामाची छोटी छोटी कामे करता येणे.<br>❖ |
| ➢ साहित्य | : | सुई, दोरा, बटन...इत्यादी |
| ➢ Youtube Link | : | |
| ➢ सूचना | : | • लहान मुलांनी सुईचा वापर नीट करावा. मोठ्यांच्या उपस्थितीमध्ये कृती करावी.<br>• सुईमध्ये दोरा ओवणे. बटन लावणे... |
| ➢ Learning intervention | : | पिअर, ग्रुप. |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, कॉन्फिडन्स. |
| ➢ 9 Intelligences | : | शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता |

- **उपक्रम** : **चला कोडी सोडवूया.**
- **उद्देश** :
  - शब्द ज्ञान वाढविणे, विचारांना चालना देणे,मनोरंजन.
  - 
- **साहित्य** : Youtube Link
- **Youtube Link** : https://youtu.be/6MiIMgwgUdQ?si=e_5GMPlkXlgdo2f4
- **सूचना** :
  - विषय मित्र व घरातील कोणाचीही मदत घेवून Youtube Linkवरील कोडी सोडवणे.
  - 
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स.
- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

२१ व्या शतकातील कौशल्य आणि शिक्षणाची भविष्यवेधी दिशा
एकात्मिक जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाकडे

- **उपक्रम** : **चित्रांचे वर्गीकरण करूया.**
- **उद्देश** :
  - ❖ दिलेल्या चित्रांची संख्या मोजून त्यांचे वर्गीकरण करता येणे.
  - ❖ व्यक्तीच्या विविध भावनांचे उदात्तीकरण करणे.
- **साहित्य** : युट्युब लिंक, पेन्सिल,चित्रकला वही.
- **Youtube Link** : https://youtube.com/shorts/9x-SSCe3JUo?si=EK3x_y7oxlovsFXr
- **सूचना** :
  - सोबत दिलेल्या youtube व्हिडिओतील प्रत्येक पानावरील इमोजीची चित्रे पाहून ती मोजणे.
  - त्याप्रमाणे वहीमध्ये चार्ट तयार करणे.
  - रागीट, दु:खी, आनंदी... अशा विविध इमोजीची किती चित्रे आहेत ती मोजून अंक लिहिणे.
  - दुसरी- तिसरीच्या मुलांनी इमोजीची चित्रे वहीत काढावीत.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स, कम्पेशन.
- **9 Intelligences** : तार्कीक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता

| | |
|---|---|
| ➢ **उपक्रम** | : **कुंडीत रोप लावणे.** |
| ➢ **उद्देश** | : ❖ 'एक झाड लावू मित्रा त्याला पाणी घालू' ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणणे. |
| ➢ **साहित्य** | : कोणतेही आवडीचे एक रोप, कुंडी, माती, पाणी. |
| ➢ **Youtube Link** | : https://youtube.com/shorts/9x-SSCe3JUo?si=EK3x_y7oxlovsFXr |
| ➢ **सूचना** | : • आजी-आजोबा किंवा आई-वडिलांशी याविषयावर संवाद साधा व माहिती गोळा करा.<br>• आवडीचें रोप कुंडीत लावून त्याची जोपासना करा व शाळा सुरू झाल्यावर शाळेत घेऊन या. |
| ➢ **Learning intervention** | : वैयक्तिक, पिअर, ग्रुप. |
| ➢ **6 Cs** | : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कम्पेशन. |
| ➢ **9 Intelligences** | : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता, निसर्गविषयक बुद्धिमत्ता. |

➢ **उपक्रम** : **परिसरातील पक्ष्यांसाठी अन्न, पाणी, निवारा यांची व्यवस्था करणे.**

➢ **उद्देश** :

- ❖ पक्षी संवर्धनासाठी उन्हाळ्यात पक्ष्यांना अन्न ,पाणी व निवारा यांची व्यवस्था करणे.
- ❖ विद्यार्थ्यांमध्ये भूतदया आणि सहानुभूती विकसित करणे.
- ❖ निसर्गाविषयीची आवड व पक्षी संवर्धनाविषयीची जाणीव जागृती करणे.
- ❖ नवनिर्मितीस चालना देणे.

➢ **साहित्य** : परिसरात व घरात आढळणारी रिकामी खोकी, पसरट डबे,वाट्या,बाटल्या, नारळाच्या करवंट्या इत्यादी.

➢ **Youtube Link** :

➢ **सूचना** :

- पालक, मित्र आणि इतरांची मदत घेऊन पक्ष्यांसाठी रिकाम्या खोक्यांपासून निवारा बनवणे.
- रिकामे पसरट डबे ,बाटल्या आणि वाट्यांमध्ये, दररोज धान्याचे दाणे व पाणी ठेवणे.
- बनवलेल्या घरांचा व पक्ष्यांसाठी पाणी व अन्न ठेवण्यासाठी केलेल्या सोयीचे फोटो काढणे, video करणे व पाठवणे.

➢ **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

➢ **6 Cs** : कम्पॅशन,क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन

➢ **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, निसर्गविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **चला गीत गायन करूया.**
- **उद्देश** :
  - आपल्या आवडीचे कोणतेही एक बडबड गीत किंवा अभिनय गीत, कृतियुक्त गीत म्हणता येणे.
  -
- **साहित्य** : आवश्यकतेनुसार वेशभूषा, मोबाईल फोन.
- **Youtube Link** :
- **सूचना** :
  - गीताला साजेशी वेशभुषा करून गीत सादरीकरण करणे.
  - त्याचा व्हिडिओ बनवणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : कॉन्फिडन्स, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.
- **9 Intelligences** : व्यक्तीअंतर्गत बुद्धिमत्ता,शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **इंग्रजी Word Bank तयार करणे.**
- **उद्देश** :
  - इंग्रजी वर्णमालेची ओळख होणे.
  - शब्दसंपत्ती वाढणे.
  -
- **साहित्य** : वही, पेन, पुस्तक, चार्ट.
- **Youtube Link** :
- **सूचना** :
  - Colours' name, Animals' name, Flowers' name इत्यादींविषयक वर्ड बँक तयार करा.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स, कोलॅबरेशन.
- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **तुम्हाला आवडणाऱ्या व न आवडणाऱ्या भाज्यांची नावे लिहा.**
- **उद्देश** :
  - विविध प्रकारच्या भाज्यांची ओळख होणे.
  - मुलांची निरीक्षण क्षमता वाढणे.
  -
- **साहित्य** : Youtube link, भाज्या चार्ट.
- **Youtube Link** : https://youtube.com/watch?v=8sxJc-onwhY&feature=shared
- **सूचना** :
  - दिलेला व्हिडिओ पहा. घरातील मोठ्या व्यक्तींशी चर्चा करून भाज्यांचे महत्त्व समजून घ्या.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन
- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता.

➢ उपक्रम : **मुखवटे तयार करणे आणि त्यांना कल्पकतेने सजवणे.**

➢ उद्देश :

- ❖ टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे.
- ❖ विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे.
- ❖ कृतियुक्त आनंददायी शिक्षण.
- ❖

➢ साहित्य : कार्ड पेपर, रबर, नारळाच्या दोऱ्या, कात्री, वॉटर कलर, पाणी, ब्रश.

➢ Youtube Link : https://youtube.com/watch?v=4fBur9fe7_M&feature=shared

➢ सूचना :



- युट्युब ची लिंक पाहून घरातील मोठ्या व्यक्तीच्या मदतीने मुखवटे तयार करा व त्या मुखवट्यांच्या हनुवटीला नारळाच्या केसांची दाढी व ओठांवर मिशा तयार करा.

➢ Learning intervention : पिअर, ग्रुप.

➢ 6 Cs : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन.

➢ 9 Intelligences : तार्किक बुद्धिमत्ता, शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्ता, कॉन्फिडन्स.

- **उपक्रम** : **इको ब्रिक्स तयार करणे.**
- **उद्देश** :
  - प्लास्टिकचा कचरा व त्याचा उपयोग योग्य रीतीने करता येणे.
  - प्लास्टिक वस्तूच्या प्रदूषणाला आळा घालणे.
  - टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे.
  - विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे. कृतियुक्त शिक्षण
- **साहित्य** : वापरात नसलेल्या व खराब झालेल्या प्लास्टिकच्या पिशव्या, कुरकुरे-चॉकलेट यांचे रॅपर, युज अँड थ्रो च्या पाणी बॉटल.
- **Youtube Link** :
- **सूचना** :



  - चित्रात दाखवल्याप्रमाणे कृती करा.
  - या कृती करत असताना आपले आई-वडील, भाऊ-बहीण आणि मित्र यांची मदत घ्यावी.
  - बॉटलमध्ये प्लास्टिक पिशवी भरत असताना रॉडच्या/ काठीच्या सहाय्याने पूर्णपणे दाबून भरावे जेणेकरून बॉटल चपटी होणार नाही.
  - या बॉटल आपल्याला झाडाच्या आजूबाजूला विटांप्रमाणे ठेवून आकर्षक असे कंपाउंड करता येते.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, निसर्गविषयक बुद्धिमत्ता.

➢ उपक्रम : **ठिपक्यांच्या मदतीने चला विविध आकार काढूया.**

➢ उद्देश :
❖ विविध भौमितिक आकारांची ओळख होणे.
❖ कल्पनाशक्ती विकसित करणे.

➢ साहित्य : पेन्सिल, वही, रंगीत खडू.

➢ Youtube Link : https://youtu.be/4RPwYiC62PI?si=rYp02vcu0Ui9z4Do

➢ सूचना :
- व्हिडिओ पाहणे.
- आपल्या कल्पनेने ठिपके जोडून विविध आकार तयार करणे व रंगवणे.

➢ Learning intervention : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

➢ 6 Cs : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.

➢ 9 Intelligences : शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **गाणे ऐका, म्हणा व नृत्य करा.** |
| ➢ उद्देश | : | ❖ मनोरंजनातून शिकणे.<br>❖ शारीरिक हालचाली होणे.<br>❖ तंत्रज्ञानाची माहिती मिळणे. |
| ➢ साहित्य | : | टेपरेकॉर्डर, मोबाईल, नाच रे मोरा, नन्ना मुन्ना राही… यांसारखे गाणे. |
| ➢ Youtube Link | : | |
| ➢ सूचना | : | • कृती करताना video बनवावा. |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, कॉन्फिडन्स. |
| ➢ 9 Intelligences | : | शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता, सांगीतिक बुद्धिमत्ता. |

- **उपक्रम** : **घरातील एक व अनेक अशा वस्तूंची यादी करणे.**
- **उद्देश** :
  - एक वचन, अनेक वचन समजणे.
  -
- **साहित्य** : घरातील विविध वस्तू.
- **Youtube Link** :
- **सूचना** :
  - घरातील विविध वस्तू घेऊन त्यांच्या नावांचे एक-अनेक या गटात विभागणी करा.
  - वस्तूंच्या एक-अनेक नावांची यादी तयार करा.
- **Learning intervention** : पिअर, ग्रुप
- **6 Cs** : क्रिटिकल थिंकिंग
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, भाषिक बुद्धिमत्ता.

21 व्या शतकातील कौशल्य आणि शिक्षणाची भविष्यवेधी दिशा
वेध
एक पाऊल जागतिक दर्जाच्या भविष्यवेधी शिक्षणाकडे

- **उपक्रम** : **मेहंदी काम – हातावर मेहंदी ने नाव लिहिणे.**
- **उद्देश** :
  - ❖ मुलांना रेखाटनांचा सराव होणे.
  - ❖ विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे.
  - ❖
- **साहित्य** : मेहंदी कोन, मेहंदी डिझाईन पुस्तिका.
- **Youtube Link** :
- **सूचना** :
  - मेहंदी ने हातावर नाव लिहिणे आणि वेगवेगळ्या डिझाइन्स काढून डेकोरेट करणे.



  - 
- **Learning intervention** : पिअर, ग्रुप
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कॉन्फिडन्स.
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **कागदापासून ससा, होड्या बनवूया. (ओरिगामी).**
- **उद्देश** :
  - कागदापासून निरनिराळ्या वस्तू बनवणे.
  - विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणे.
  - निरीक्षण क्षमता विकसित होणे.
  - कृतीयुक्त शिक्षणास वाव देणे.
  -
- **साहित्य** : कागद.
- **Youtube Link** :
  - https://youtube.com/watch?v=G-bEiMjvrxY&feature=shared
  - https://youtu.be/WKR-7Kkm660?feature=shared
  - https://youtu.be/oAbSit7q6UU?feature=shared
- **सूचना** :
  - पालकांनी विद्यार्थ्यांना यूट्यूब वरील व्हिडिओ दाखवणे.
  - विद्यार्थ्यांना होड्या व ससा बनवण्यास सांगणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.
- **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता, शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक यासारख्या महत्त्वाच्या दस्तऐवजांची माहिती होणे.**
- **उद्देश** :
  - आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक कशाला म्हणतात हे प्रत्यक्ष पाहून माहिती मिळणे.
  - या महत्त्वाच्या दस्तऐवजांची उपयुक्तता माहीत होणे.
  - त्यांची गरज समजून घेणे.
  -
- **साहित्य** : आधार कार्ड, बँक पासबुक, रेशन कार्ड, पॅन कार्ड.
- **Youtube Link** :
- **सूचना** :
  - पालकांच्या मदतीने प्रत्यक्ष हे दस्तऐवज पाहून त्यांची माहिती समजून घ्या.
- **Learning intervention** : पिअर, ग्रुप.
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन.
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **चला आदर करूया...**
- **उद्देश** :
  - ❖ घरातील थोरा मोठ्यांना मानसन्मान देणे व आदर करणे.
  - ❖ समाजातील वडिलधाऱ्या व्यक्तींचा आधार करणे.
  - ❖ गुरुजनांचा आधार करणे.
- **साहित्य** : फूल, भेटकार्ड, संदेश देण्यासाठी छोटे चौकोनी कागद, स्केचपेन इत्यादी.
- **Youtube Link** :
  - 
- **सूचना** :
  - घरातील थोरामोठ्यांच्या पाया पडणे.
  - आई बाबांना मिठी मारणे.
  - मित्रमंडळींना हात मिळवणे, फूल देणे यांसारख्या कृती करू शकतो.
  - मोठ्याबद्दल आदर व्यक्त होईल असे भेटकार्ड तयार करणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक.
- **6 Cs** : कम्पॅशन, क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन.
- **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **नोटा आणि नाणी ओळखूया.**

- **उद्देश** :
  - ❖नाणी आणि नोटा ओळखणे.
  - ❖नाणी आणि नोटा यांतील फरक समजणे.
  - ❖त्यावर आधारित व्हिडिओ करताना तंत्रज्ञानाचा उपयोग करता येणे.
  - ❖

- **साहित्य** : सर्व प्रकारच्या नाणी व नोटा / नकली नोटा, अँड्रॉइड मोबाईल फोन.

- **Youtube Link** : https://youtu.be/SCHrqKC-85Y?feature=shared

- **सूचना** :
  - घरातील मोठ्या व्यक्तींच्या मदतीने एक, दोन, पाच, दहा,वीस या नाण्यांची व पाच, दहा, वीस, पन्नास, शंभर, दोनशे, पाचशे रुपये यांची ओळख करून घेणे.
  - नाणी व नोटा ओळखून दाखवणे व त्याचा व्हिडिओ बनवणे.


- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप.

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स.

- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : नेल आर्ट – कृत्रिम नखे रंगवणे किंवा गुलमोहराच्या फुलांपासून आकर्षक कृत्रिम नखे तयार करणे.
- **उद्देश** :
  - आनंददायी शिक्षण.
  - कल्पनाशक्तीला वाव देणे.
  - कृतीयुक्त शिक्षण.
- **साहित्य** : कृत्रिम नखे, नेलपेंट, कात्री, गुलमोहराची फुले.
- **Youtube Link** :
  - 
- **सूचना** :
  - पुढील फोटो पाहून कृती करावी.





- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **एक मिनिटाची जादू** |
| ➢ उद्देश | : | ❖ एक मिनिटामध्ये वेगवेगळ्या कृती किती करू शकतो हे अभ्यासणे.<br>❖ वेळेचे महत्व लक्षात आणून देणे. |
| ➢ साहित्य | : | अँड्रॉइड मोबाईल फोन,आवश्यकतेनुसार लागणारे साहित्य. |
| ➢ Youtube Link | : | • |
| ➢ सूचना | : | • एका मिनिटामध्ये आपण किती काम करू शकतो ते तपासणे.जसे की चालणे, उड्या मारणे, टाळ्या वाजवणे, डोळ्यांची उघडझाप करणे, दोरीवरच्या उड्या मारणे इत्यादी गोष्टी करणे.<br>• कृती करताना व्हिडिओ तयार करणे. |
| ➢ Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप |
| ➢ 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, कॉन्फिडन्स. |
| ➢ 9 Intelligences | : | शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता. |

- **उपक्रम** : इंग्रजी पुस्तकांमधील ऱ्हाइमिंग वर्ड्स (यमक जुळणारे शब्द) शोधणे व त्याचा व्हिडिओ बनवणे.

- **उद्देश** :
  - वाचनाची आवड निर्माण होणे.
  - शोधक वृत्तीचा विकास करणे.
  - निरीक्षण व तार्किक क्षमता वाढविणे.

- **साहित्य** : इंग्रजी पाठ्यपुस्तके व शक्य असल्यास इंग्रजीची छोटी छोटी पुस्तके, वही आणि अँड्रॉइड मोबाईल फोन

- **Youtube Link** :

- **सूचना** :
  - प्रथम पाठ्यपुस्तकात किंवा उपलब्ध असलेल्या इंग्रजी पुस्तकातील क्रमाने येणाऱ्या पानांवरील ऱ्हाइमिंग वर्ड्सला पेन्सिलने खुणा करणे व वहीत लिहिणे.
  - ऱ्हाइमिंग वर्ड्स वाचतानाचा व्हिडिओ तयार करणे.
  - ऱ्हाइमिंग वर्ड्स मधील असणारा स्पेलिंगजचा छोटासा फरक लक्षात घेऊन शब्दांचे स्पेलिंग्ज पाठ करणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

- **6 Cs** : क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलाब्रेशन, कॉन्फिडन्स.

- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता

- **उपक्रम** : **चला डबा पार्टी करुया.**
- **उद्देश** :
  - ❖सर्वांनी एकत्र येऊन प्रेमाने गप्पागोष्टी करणे.
  - ❖प्रेमस्नेहभाव जागृत करणे.
- **साहित्य** : आपल्या आवडीचा खाऊ, पाणी, चटई, पेपर, नॅपकिन
- **Youtube Link** :
- **सूचना** :
  - सर्वांनी एकत्रित येऊन गप्पागोष्टी करता करता विविध पदार्थांचा आस्वाद घ्यावा व त्यावर चर्चा करावी. तसेच एकमेकांना सुट्टीतील गमती जमती सांगाव्यात.
- **Learning intervention** : ग्रुप लर्निंग
- **6 Cs** : कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स, कम्पेशन
- **9 Intelligences** : आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **प्रार्थना ऐकूया व म्हणूया. (देवा तुझे किती सुंदर आकाश...)**
- **उद्देश** :
  - ❖ गायनाची आवड निर्माण होणे.
  - ❖ शोधक वृत्तीचा विकास करणे.
  - ❖
- **साहित्य** : छोट्या प्रार्थनांची पुस्तके आणि अँड्रॉइड मोबाईल
- **Youtube Link** : https://youtu.be/sBjZvopWcrU?si=uRJYmByvfEWGS213
- **सूचना** :
  - देवा तुझे किती सुंदर आकाश ही प्रार्थना मोबाईल वरून विद्यार्थ्यांना ऐकवणे.
  - प्रार्थना ऐकल्यानंतर सोबत किंवा एकट्याने प्रार्थना म्हणणे.
  - आवडणाऱ्या नवीन प्रार्थना शोधून त्या ऐकणे व म्हणणे.
  -
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप
- **6 Cs** : कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स
- **9 Intelligences** : सांगितीक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **अंक व अक्षर रेखाटन.**
- **उद्देश** :
  - ❖ आपापल्या कल्पकतेने रांगोळीच्या माध्यमातून विविध अंक, अक्षरे, आकार रेखाटणे.
  - ❖
- **साहित्य** : रांगोळी, माती ,पीठ, बारीक रेती
- **Youtube Link** : https://youtube.com/watch?v=LXsbGvjXOBo&feature=shared
- **सूचना** :
  - एका मिनिटामध्ये आपण किती काम करू शकतो ते तपासणे.जसे की चालणे, उड्या मारणे, टाळ्या वाजवणे, डोळ्यांची उघडझाप करणे, दोरीवरच्या उड्या मारणे इत्यादी गोष्टी करणे.
  - कृती करताना व्हिडिओ तयार करणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन.
- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **दिलेल्या शब्दापासून वाक्य किंवा गोष्ट तयार करणे.**

- **उद्देश** :
  - ❖ शब्दसंपती वाढविणे.
  - ❖ अभिव्यक्त होणे.
  - ❖ लेखन सवय जोपासणे.

- **साहित्य** : शब्दपट्ट्या – १) गाव, शाळा, सुट्टी, मजा
  २) मुलगा, जंगल, प्राणी
  अँड्रॉइड मोबाईल, वही व पेन

- **Youtube Link** : https://youtu.be/-CLUemZ9n_k?feature=shared
  https://youtu.be/ZNSI_ThreDk?feature=shared

- **सूचना** :
  - पालकांनी विद्यार्थ्यांसमवेत youtube वरील व्हिडिओ पाहणे व उपक्रम समजावून देणे.
  - सोबत दिलेल्या शब्दांपासून अर्थपूर्ण वाक्य बनवणे.
  - दिलेल्या शब्द पट्ट्यांवरील शब्दांपासून गोष्टी लिहिणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन

- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता,आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

| | | |
|---|---|---|
| ➢ उपक्रम | : | **मसाल्याचे पदार्थ ओळखणे.** |
| ➢ उद्देश | : | ❖मसाल्याच्या पदार्थांची ओळख होणे.<br>❖मसाल्याच्या पदार्थांचा उपयोग सांगणें.<br>❖मुलांची निरीक्षण क्षमता वाढविणे.<br>❖ |
| ➢ साहित्य | : | घरात उपलब्ध असलेले मसाल्याचे पदार्थ. |
| ➢ Youtube Link | : | • |
| ➢ सूचना | : | • आई किंवा आजीकडून मसाल्याच्या पदार्थांची नावे माहीत करून घ्या व त्याचा व्हिडिओ तयार करा. |
| ➢ Learning intervention | : | पिअर, ग्रुप |
| ➢ 6 Cs | : | क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन |
| ➢ 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता. |

➢ **उपक्रम** : **नक्कल करणे व व्हिडिओ बनवणे.**

➢ **उद्देश** :

- ❖ वेगवेगळ्या व्यक्तींच्या, प्राणी व पक्ष्यांच्या नकला करणे. [आजी,आजोबा, शिक्षक, भाजीवाले, प्राणी, पक्षी इ.]
- ❖ नक्कल करतानाचा आनंद घेणे.
- ❖ निरीक्षण व तार्किक क्षमता विकसित होणे.

➢ **साहित्य** : ज्या व्यक्तीची, प्राणी - पक्ष्यांची नक्कल करणार आहेत त्याप्रमाणे वेशभूषा, अँड्रॉइड मोबाईल.

➢ **Youtube Link** : https://youtu.be/vSgQ_Iw9qUU?si=7P7IJqyjIlmXiqMF

➢ **सूचना** :

- पालकांनी वरील प्रकारची वेशभूषा करण्यास मदत करणे.
- विद्यार्थ्याने केलेल्या वेशभूषेचा आणि नकलेचा व्हिडिओ तयार करून शिक्षकांना पाठवणे.

➢ **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

➢ **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन,कॉन्फिडन्स.

➢ **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता, शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **चला खेळूया शब्दांची लपाछपी.**

- **उद्देश** :
  - ❖ मोठ्या शब्दातील अक्षरांपासून लहान लहान अर्थपूर्ण शब्द तयार करणे.
  - ❖ विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होता येणे.
  - ❖ निरीक्षण क्षमता विकसित होणे.
  - ❖

- **साहित्य** : सात ते आठ अक्षरी शब्द शोधणे, त्यांची यादी तयार करणे.

- **Youtube Link** :
  - 

- **सूचना** :
  - पाठ्यपुस्तक, वर्तमानपत्र यामध्ये सात ते आठ अक्षरी शब्द शोधा किंवा तुमचे आई-बाबा, मोठे बहीण-भाऊ यांना विचारून सात ते आठ अक्षरी शब्द लिहून घ्या आणि त्यातील मोठ्या शब्दातील अक्षरांपासून लहान लहान अर्थपूर्ण शब्द तयार करा व लिहा .
  - उदा. मोठा शब्द - अहमदनगर
  - यात लपलेले लहान अर्थपूर्ण शब्द-
  - अहमद, मन,नगर, नग, गर,दर,मगर,गरम

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स

- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

➢ **उपक्रम** : **चला शोधूया चित्रात लपलेले नाव.**

➢ **उद्देश** :
❖ चित्र व शब्द यांचा सहसंबंध जोडता येणे.
❖ विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होता येणे.
❖ निरीक्षण क्षमता विकसित होणे.

➢ **Youtube Link** :
- 

➢ **सूचना** :
- चित्रात लपलेले नाव शोधा व सांगा.
- -नागपूर
- - ____________
-  गाव - ____________
-  गाव - ____________
- ७- ______________
- - ____________
-  गाव - ____________
-  - __________
-  - __________
- ही यादी तुमच्या आई - बाबा, मोठे भाऊ - बहीण, मित्र-मैत्रिणी यांच्या मदतीने वाढवा...

➢ **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

➢ **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स

➢ **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **मातीची खेळणी तयार करणे.**

  **[कच्च्या मातीपासून बैलजोडी व दिवे इ.]**

- **उद्देश** :
  - ❖ मुलाचे मातीशी नातं तयार करणे.
  - ❖ सणाबद्दल महिती असणे.
  - ❖

- **साहित्य** : माती, क्ले.

- **Youtube Link** : https://youtu.be/fDj1jlhpk5U?si=qkBpVtTQPUwLjhUW
  https://youtu.be/RH2D-M8uAKo?si=U2cHvt2mBLtO77y3

- **सूचना** :
  - १) पालकांनी मुलांना युट्युब व्हिडिओ दाखवणे.
  - २) ओल्या मातीपासून पणत्या व बैल बनवण्यास सांगणे.

- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप

- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स.

- **9 Intelligences** : तार्किक बुद्धिमत्ता, शरीरस्नायूविषयक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **दैनंदिन व्यवहारातील इंग्रजी मधील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधणे.**
- **उद्देश** :
  - ❖ इंग्रजी भाषेविषयी आवड लावणे.
  - ❖ निरीक्षणातून भाषिक विकास साधणे.
  - ❖ इंग्रजी शब्दसंपत्ती वाढवणे.
  - ❖
- **साहित्य** : -
- **Youtube Link** : https://youtu.be/cb-Br-hfCEk?si=EjQz4sTduIP9XcvT
- **सूचना** :
  - दिलेला व्हिडिओ पाहून त्यातील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या समजून घेणे. याचप्रमाणे आणखी विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधण्याचा प्रयत्न करणे.
  - विरुद्धार्थी शब्द यांच्या जोड्या वहीत लिहिणे.
- **Learning intervention** : वैयक्तिक, पिअर, ग्रुप
- **6 Cs** : क्रिएटिव्ह थिंकिंग, कम्युनिकेशन, कॉन्फिडन्स.
- **9 Intelligences** : भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

- **उपक्रम** : **Doodle art मधील छोट्या छोटया चित्रांचा सराव करून मुखपृष्ठाची सजावट करणे.**

- **उद्देश** :
  - सृजनशीलता वाढविणे.
  - कृतिशील विद्यार्थी तयार करणे.
  - विचार प्रवृत्त करणे.
  - कलात्मक वृत्ती विकसित करणे.

- **साहित्य** : Youtube Link, Doodle चित्रपट्ट्या, चित्रकला वही, रंगीत पेन किंवा स्केच पेन इत्यादी.

- **Youtube Link** : https://youtu.be/CY_DdIbS1K0?si=zoVqsP7s7n-_B3xV

- **सूचना** :
  - पालकांनी विद्यार्थ्यांसोबत you tube वरील व्हिडीओ पाहून मुलांना कृती समजावून देणे.
  - सदर चित्रांचा सराव चित्रकला वहीत करून घेणे.

- **Learning intervention** : पिअर, ग्रुप

- **6 Cs** : कॉन्फिडन्स, कम्युनिकेशन, क्रिएटिव्ह थिंकिंग क्रिटिकल थिंकिंग


- **9 Intelligences** : शरीर स्नायूविषयक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.

# श्रेयनामावली

| अ.क्र. | नाव | शाळा/ कार्यालय | मोबाईल क्र. |
|---|---|---|---|
| 1 | सौ. संगीता बाजीराव ठुबे | जि. प. प्राथमिक शाळा काटई ता. कल्याण, जि. ठाणे | 83696 67603 |
| 2 | श्री. सुपडा माठे | सरस्वती प्राथमिक आश्रमशाळा पिंपळगाव, ज़ि. बुलढाणा | 94230 55732 |
| 3 | शहाजहा खान | जि.प. उ.प्रा. उर्दु शाळा नांदगाव पेठ, अमरावती | 91586 88017 |
| 4 | सौ. शीला उमेश पाटील | बालमोहन विद्यामंदिर, दादर, मुंबई | 98195 72994 |
| 5 | श्रीम. पूनम ज्ञानदेव भामरे | नाशिक मनपा शाळा क्र 18 आंनदवली गंगापूर रोड, नाशिक | 7028198343 |
| 6 | सौ. प्रतिभा नंदू वाळके | पिंपळे निलख मुले मुली क्रमांक 52, पिंपरी चिंचवड. | 92723 36899 |
| 7 | सौ. मनिषा राजेंद्र कुऱ्हाडे | जि. प. प्राथ. शाळा, आनंदवाडी ता. जुन्नर, पुणे | 95610 93707 |
| 8 | सौ. रागिणी सज्जन वाडेकर | जिल्हा परिषद शाळा पावला पश्चिम, नंदुरबार | 8379838712 |
| 9 | श्रीम. योगिता देवचंद तेली | अनु. प्राथ. आश्रम शाळा राजदेरवाडी, चांदवड, नाशिक | 83085 96633 |
| 10 | श्री. अभिजीत देशमुख | जि.प.वरिष्ठ प्राथ. शाळा पोही, मूर्तिजापूर, अकोला | 96375 50465 |
| 11 | अल्का फुलझेले | जि. प. प्राथ. शाळा थुटानबोरी, भिवापूर,जि. नागपूर | 8806678442 |
| 12 | सौ. अमिता नरेंद्र राऊत | वसंतराव नाईक प्रा.व मा. आश्रम शाळा पुसगोंदी, नागपूर | 88578 44083 |
| 13 | श्रीम. कल्पना भुसारी | जि.प.उ.प्रा.शा.सुराबर्डी टोली, नागपूर | 72760 06188 |
| 14 | श्री.रविंद्र निळ पाटील | छ. संभाजीनगर रविंद्रनाथ टागोर विद्यालय कन्नड, छ. संभाजीनगर | 94231 54220 |
| 15 | श्रीम.विद्या देशमुख- मेमाणे | जि.प.प्राथ. शाळा झिंजूरकेवस्ती जुनी, पुरंदर, पुणे | 9011686368 |
| 16 | सपना तांब्रध्वज मानकर | जि. प. प्राथ. शाळा नागलवाडी केंद्र-वानाडोंगरी, नागपूर | 9421704173 |
| 17 | सौ. वैशाली दाभाडे | तिरुपती प्राथमिक आश्रम शाळा पाचेगाव, गेवराई, बीड | 8888335887 |
| 18 | सौ.कांचन रामटेके | जि.प.प्राथ. शाळा घोगली(न) केंद्र, वेळाहरी पं. स. नागपूर | 99700 61262 |
| 19 | श्रीम. स्मिता जगतराव पाटील | जि. प. प्राथ. शाळा करहर, जावळी, सातारा | 90496 82025 |
| 20 | शफी काझी | टेक्निकल सपोर्ट | 90117 21789 |


# वेध पब्लिकेशन ची पुस्तके










आपणसुद्धा आजच खरेदी करा

“आम्ही पुस्तके घेतली, आपणसुद्धा आजच मागणी करा.”














# वेध पब्लिकेशन वाचक अभिप्राय

## आजच संपर्क करा- 9890018388

## वाचक अभिप्राय - वेध पब्लिकेशन

❝ केवळ मी शिकवतो म्हणून मुलांना येते, हा विचार बाजूला करून मुलांना काय आवडते, ह्या गोष्टी हेरून व्यवहारातील छोट्या छोट्या गोष्टींमधून मुलांचे शिकणे कसे होते, यांची खूप सारी उदाहरणे यापुस्तकामध्ये वाचायला मिळाली. यामध्ये हे पटवून दिले आहे की केवळ पुस्तकातले शिकवणे म्हणजेच शिक्षण नाही तर मुलांना आवडणाऱ्या गोष्टी व दैनंदिन घरगुती प्रसंगातून मुलांचे किती शिकणे होत असते हे या दोन्हीही पुस्तकांमधून शिकायला मिळाले. प्रत्येक घटक मुलांना सहज समजेल अशा पद्धतीने हाताळला आहे. जर प्रत्येक शिक्षकांनी अशाच प्रकारचं वातावरण आपल्या वर्गात निर्माण केलं तर प्रत्येक मुलांमध्ये 21 व्या शतकातील कौशल्ये मुलांमध्ये रुजतीलच, असा विश्वास वाटतो. ❞











नितीन टाक
वेध जिल्हा संयोजक,
अमरावती

संपर्क
वेध पब्लिकेशन
9890018388

## वेध पब्लिकेशन पुस्तकांबाबत वाचकांचा अभिप्राय




श्री. सुपडा काशिराम माठे
सरस्वती प्राथमिक
आश्रम शाळा पिंपळगांव काळे



❝ आपण पाठ्यक्रम शिकवणे म्हणजेच मुलांचे शिकणे नाही, तर मुलांच्या आवडीनुसार छोट्या छोट्या कृती करून घेणे, मुलांचे भावविश्व ओळखून त्यांच्याकडून करून घेतलेल्या अगदी छोट्या छोट्या गोष्टी आणि त्यांना खेळाची जोड देणे अशा कृतींची मालिका म्हणजे ग्लिम्पंसेप ऑफ लर्निंग या पुस्तकातील संवाद होय.
मुलांचे शिकणे अगदी सहज व्हावे याकरिता प्रत्येक शिक्षकाने हे पुस्तक वाचायला हवे.
धन्यवाद वेध पब्लिकेशन! ❞

**मोफत घरपोच मागणीसाठी संपर्क**

वेध पब्लिकेशन मो. 9890018388

❝ वेध पब्लिकेशनचे Spoken English वेध कृती हे पुस्तक शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ज्यांना ज्यांना इंग्रजी बोलण्याची गरज आहे, आवड आहे अशा सर्वांसाठी हे पुस्तक मैलाचा दगड ठरणार आहे. आजपर्यंत बाजारात आलेल्या अशा पुस्तकांची संख्या खूप मोठी आहे. परंतु ग्राऊंड रुटला शिकणाऱ्याच्या काय अडचणी असतात, ते कोणालाच माहित नसतात. या वेधकृती बनवताना शिकणारी मुले, पालक, शिक्षक यांच्या भावविश्वाचा विचार केला आहे. त्यांच्या उपलब्धतेचा विचार केला आहे. त्यामुळे यांना काय हवंय ते डोळ्यांसमोर ठेवून त्या कृती बनवल्या आहेत. म्हणून मला वाटते, हे पुस्तक आम्हा सर्वांसाठी खूपच उपयुक्त आहे. एवढ्या कृती जरी केल्या तरी माणूस हंग्रजी बोलू शकतो. असा मला विश्वास वाटतो. धन्यवाद वेध पब्लिकेशन! ❞


श्री.अशोक निकाळजे
जि.प. प्रा. शा. अगर नांदुर
ता. गेवराई, जि. बीड




**मोफत घरपोच मागणीसाठी संपर्क**

वेध पब्लिकेशन
मो. 9890018388

## वाचक अभिप्राय - वेध पब्लिकेशन







❝ नमस्कार, नुकतेच मी वेध पब्लिकेशन चे ग्लिम्पसेस ऑफ लर्निंग हे पुस्तक वाचले. यात शिक्षकांचे मुलांसोबतचे प्रेमळ आणि मुक्त नाते दिसून आले. पारंपारिकतेकडून भविष्यवेधी शिक्षण पद्धतीकडे जाताना २१ व्या शतकाती मुलांना कसं जपावं, त्यांना शिकते कसे करावं हे खूपच प्रभावी वाटले. मूल समजून घेतानाची प्रेरणा, मुलांकडूनच मुलांना शिकते करण्याची युक्ती, उपलब्ध परिस्थिती, क्लृप्ती, मुले शिकण्याची तिप्पट गती, दैनंदिन जीवनातून शैक्षणिक अनुभवांद्वारे आपण कसे समृद्ध होत जाऊ, याविषयीचे छोटे छोटे पण भन्नाट उपयोगी असे किस्से वाचताना खरंच मी प्रत्यक्ष त्या वर्गात, वातावरणात रममाण होऊन गेले. या पुस्तकातील किस्से वाचताना एक वेगळ्याच प्रकारची मोहिनी मनाला भुलवून जाते. शेवटी पुस्तकात एक वाक्य आहे, इच्छा माझी पुरी झाली.... वेध पब्लिकेशन नी अशाच प्रकारे अनेक पुस्तके लिहून आम्हा शिक्षक, वाचकांच्या इच्छा नेहमीच पुऱ्या 😊 कराव्यात ही अपेक्षा! धन्यवाद वेध! 🙏 ❞

Free Home Delivery

संपर्क
वेध पब्लिकेशन
9890018388

शिल्पा अशोकराव तवर
ता. वसमत, जि. हिंगोली